# दिवा न्यूज


दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–१२

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २३ ऑक्टोबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com






'नाळ'च्या पहिल्या भागात 'चैतू'ची आई त्याच्याशी न बोलताच निघून गेली. आता चैतू त्याच्या आईला भेटायला जाणार आहे. इतकी वर्षं झाल्यानंतर त्यांच्यातील अबोला संपेल का? याचे उत्तर प्रेक्षकांना १० नोव्हें. ला चित्रपटगृहात प्रकाशित होणाऱ्या 'नाळ भाग २' मध्ये मिळेल यात शंका नाही.


# घनकचरा विभाग आक्रमक

## कचरा कराल तर खबरदार

## दररोज १०० किलोग्रॅम कचरा करणाऱ्यांना नोटिसा देण्याची तयारी






## मॉलसह दोन हजार सोसायट्यांचा समावेश

**ठाणे : केंद्र सरकाराने साधारणपणे पाच वर्षांपूर्वी काढलेल्या एक अध्यादेशाला अनुसरून तब्बल दोन वर्षांनी दररोज १०० किलो ग्रॅम पेक्षा जास्त कचऱ्याची निर्मिती करणाऱ्या आस्थापना आणि सोसायटी यांच्याकडे लक्षकेंद्रित करण्यास सुरू केली आहे. त्यानुसार त्यांना नोटीस बजावण्याच्या तयारीला लागले आहेत. यामध्ये शहरातील चार मॉल सह दोन हजार सोसायट्यांचा समावेश आहे. तसेच कचरा तुमचा मग प्रक्रिया ही तुम्हीच करा असे म्हणून पुढच्या आठवड्यात नोटिसा वाटपाला सुरुवात होईल असे ठाणे महापालिका घनकचरा विभागाने सांगितले आहे.**

केंद्र सरकारच्या अध्यादेशानुसार तीन वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने शहरातील ४२५ सोसायटी व आस्थापनांना नोटीसा बजावल्या होत्या. त्यावेळी राजकीय हस्पक्षेप झाला होता. हा हस्तक्षेप लक्षात घेत, महापालिका प्रशासनाने नोटिसा बजावणे थांबवले होते. मात्र तरी तीन वर्षात शहरातील ९५ सोसायंटी आणि आस्थापनांनी स्वतःहून कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प सुरु असल्याचा दावा पालिकेने केला होता.

दरम्यान आता महापालिकेचे हक्काचे डम्पींग अर्थात कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्पही सुरु होत आहे. त्यामुळे भविष्यात कचऱ्याची समस्या आणखी जटील होई यादृष्टीने महापालिकेने केंद्र सरकारच्या अध्यादेशाचा आधार घेत पावले टाकली आहेत. सध्या हिरानंदानी भागात ५ मेट्रीक टनचा प्रकल्प राबविली जात आहे. तसेच शहरातील इतर काही सोसायटी देखील अशा पध्दतीने प्रकल्प राबवित आहेत. त्यातही महापालिकेने केलेल्या एका सर्व्हेत १४० अशा सोसायट्या आहेत, त्याठिकाणी १०० किलो पेक्षा अधिकचा कचरा निर्माण होत आहे. त्यामुळे पहिल्या टप्यात त्यांच्यापासून सुरवात करण्याचा पालिकेचा मानस आहे.

### काय म्हणतोय तो अध्यादेश

**साधारणपणे पाच वर्षांपूर्वी केंद्र सरकाराने एक अध्यादेश काढला होता, त्यामध्ये ज्या सोसायटी अथवा आस्थापनामध्ये प्रतीदीन १०० किलोग्रॅम पेक्षा जास्त कचऱ्याची निर्मिती होते. तसेच ज्या सोसायटी ५ हजार स्केअर मीटरच्या क्षेत्रात वसल्या आहेत, त्यांनी त्यांच्या कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याच ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावावी असे स्पष्ट केले आहे.**

**माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या वतीने आयोजित दिवा विकास प्रतिष्ठानच्या दांडिया उत्सवाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उत्सवात विजेत्यांना विविध बक्षीस देऊन गौरवण्यात आले.**












## शैलेश पाटील आयोजित नवरात्रौत्सवातील क्षणचित्रे




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# कळव्यातील कैलास हाईटस् बिल्डींग ठाणे महसूलकडून सीज

## बिल्डर विरोधात कळवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**ठाणे:** ठाण्यातील कळवा परिसरात बिल्डरच्या मनमानी कारभारा विरोधात महारेरा कायद्या अंतर्गत एका बिल्डर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांची फसवणुक केल्याबद्दल ठाणे तहसिलदार युवराज बांगर व नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांच्या पथकाने गुरुवारी रात्री कैलास हाईट्स ही इमारत सीज करुन बिल्डर कैलास पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.१ कोटी ५२ लांखांची फसवणुक केल्याबद्दल हा गुन्हा दाखल केला आहे. ठाणे जिल्हयात पहिल्यांदा अश्या प्रकारची बिल्डर विरोधात महसूल ची कारवाई समोर येत आहे.

महसूल विभांगाकडून बिल्डर ला वारंवार नोटीस बजावून ही बिल्डर नी नोटीस व नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कळवा पुर्व मधील कैलास हाईट्स ही इमारत सीज करुन बिल्डर विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यामुळे आता बिल्डर वर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याचे नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांनी सांगितले आहे.

# ज्योती पाटील यांच्या तर्फे नवरात्री स्पर्धेचे आयोजन

**दिवा:**–तनवी फाउंडेशनच्या माध्यमातून ज्योती पाटील यांनी महिलांसाठी नवरात्री विशेष स्पर्धेचे आयोजन केले होते यामध्ये पाककला स्पर्धा संगीत खुर्ची व उखाणा स्पर्धेचा समावेश होता. **संगीता खुर्ची स्पर्धेत** श्रुती पवार, मिनाक्षी शिंदे, विवेक सिंग हे विजेते ठरले तर

**पाककला स्पर्धेत** : **शुभा बने पहिली विजेता** ठरली.तिला वोशिंग मशिन, पैठणी बक्षीस प्रदान करण्यात आले. **मनीषा रेडकर दुसरी विजेता** ठरली. तिला कुलर, पैठणीबक्षीस मिळाले. **पुनम लाड तिसरी विजेता** ठरली तिला मिक्सर व पैठणी बक्षीस मिळाले. **उज्वला काळे चौथी विजेता** डिनर सेट. **प्रणाली नाईक पाचवी विजेती** पैठणी डबा. **भाग्यश्री जाधव सहावी. राधिका पाठक सातवी. सविता सरफरे आठवी** तर **सुरभी सावंत नववी विजेता** ठरली.

स्पेशल उखाना स्पर्धेत उषा साळुंखे विजेता ठरली. या स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सहभागी महिलांची ज्योती पाटील यांनी आभार मानले.



# मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेने पटकाविले 'बेस्ट स्टुडंट नर्सेस असोसिएशन युनिट'चे प्रथम पारितोषिक

**ठाणे :** ट्रेंड नर्सेस असोशिएशन ऑफ इंडिया महाराष्ट्र शाखा व मराठा विद्या प्रसारक मंडळ इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशनचे यांच्या संयुक्त विद्यमाने स्टूडेंट नर्सेस असोसिएशन चे ३० वे राज्य स्तरीय अधिवेशन नाशिक येथे नुकतेच पार पडले. या अधिवशेनात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मीनाताई ठाकरे परिचर्या संस्थेच्या २९ विद्यार्थी परिचारिका सहभागी झाल्या होत्या. या विद्यार्थीनीनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेवून एकूण ११ परितोषिके पटकाविली. तर संपूर्ण महाराष्ट्रातून युनिट हे मानाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेस मिळाले असून महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थी परिचारिका, संस्थेच्या प्राचार्या यांचे कौतुक केले आहे.

नाशिक येथील गुरूदक्षिणा सभागृह येथे हे अधिवेशन पार पडले. या अधिवशेनात राज्यभरातील विविध परिचर्या संस्थेतून जवळपास ८७७ विद्यार्थी परिचारिका सहभागी झाल्या होत्या. यावेळी झालेल्या पोस्टर स्पर्धेत 'बायोमेडिकल कचरा व्यवस्थापन, ऑस्टॉमी केअरमध्ये नर्सची भूमिका, स्टुडंट नर्सिंग असोसिएशनची व्हिजन २०२९ शताब्दी, मूत्रप्रणाली, पोस्अ कोविड युग नर्सिंगमध्ये' ही पोस्टर्स साकारणाऱ्या सुरभी वाडकर, शबाना खान, प्राजक्ता कोंगरे, मृण्मयी जाधव या विद्यार्थी परिचारिका विजेत्या ठरल्या. तर रांगोळी स्पर्धेत ध्रुवी देसाई हिला तर नृत्यस्पर्धेत वेदिका आणि सहकारी यांनी पारितोपिक पटकाविले. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेने एकूण ११ पारितोषिके प्राप्त केली.

# आम्हाला नाव ठेवणारे रोहिदास मुंडे आता कोण? गद्दार की खुद्दार?

## निलेश पाटील यांचा सवाल



**दिवा:**– जेव्हा आम्ही भाजप मधून शिवसेनेत प्रवेश केला त्यावेळी आम्हाला गद्दार म्हणणारे रोहिदास मुंडे यांनी स्वतः ठाकरे च्या शिवसेनेत प्रवेश केला, तेव्हा ते स्वतःला काय म्हणणार? असा खरमरीत सवाल शिंदेंच्या शिवसेनेचे विभाग प्रमुख निलेश पाटील यांनी विचारला आहे.

जेव्हा आम्ही शिवसेना पक्षात प्रवेश करतो तेव्हा आम्हाला गद्दार म्हणून हेच माजी अध्यक्ष महाशय बोलत असतात,टीका करायचे आता तुम्हाला ''गद्दार का खुद्दार'' काय म्हणायचे? कोण स्वार्थासाठी आणि जनतेसाठी पक्ष प्रवेश करतो हे जनतेला समजले आहे.

मुंडे यांच्या पक्षप्रवाशामुळे ज्या पक्षात ते गेले आहेत तेथीलच कार्यकर्ते पदाधिकारी नाराज असल्याची चर्चा निलेश पाटील यांनी बोलून दाखवली आहे.

# तुम्ही पदावर असताना गद्दारी करून बाहेर पडला, मी पदावर नसताना दिव्यातील जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी शिवसेनेची मशाल हाती घेतली

## रोहिदास मुंडेंचे विरोधकांना सणसणीत उत्तर

**दिवा:**– मला गद्दार की खुद्दार म्हणून विचारणाऱ्यांनी स्वतः आधी आरशात पहावं.त्यांनी भाजप मंडल अध्यक्ष पदावर असताना पक्षाशी गद्दारी केली आणि मी पक्षातून बाहेर पडावं म्हणून षडयंत्र करून माझं पद



काढून घेतले गेले,शिंदे गटासमोर लोटांगण घालणारे स्वार्थीच आहेत मी दिव्यातील जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात प्रवेश केला असे सणसणीत उत्तर रोहिदास मुंडे यांनी निलेश पाटील यांना दिले आहे.

दिव्यात शिंदे गटाच्या विरोधात आवाज उठवणारा विरोधी नेता नको म्हणून माझे पद काढून घेण्यासाठी कुणी कुणी काय काय षड्यंत्र केली ही जगजाहीर आहेत. भाजपच्या मंडळ अध्यक्ष चे पद जाणार हे शिंदे गटातील लोकांना दोन महिने आधी माहित होते. याचा अर्थ शिंदे गटाच्या इशाऱ्यावरच येथील भाजप चालवली जात होती. मी दिव्यातील जनतेचा आवाज बुलंद करत होतो,सत्ताधारी लोकांना प्रश्न विचारत होतो म्हणून मला राजकारणातून संपविण्याचा प्रयत्न काहींनी केला पण दिव्यातील जनतेसाठी मी उद्धव साहेबांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. दिवा शहरातील अन्यायाला यापुढे वाचा फोडण्याचे काम मी करत राहीन असेही मुंडे यांनी म्हटले आहे.

ज्या पद्धतीने मी पक्षातून बाहेर पडावे यासाठी षडयंत्र केले गेले ते पाहता पदावर असताना पक्ष सोडणाऱ्यांशी माझी तुलना होऊ शकत नाही. माझा लढा हा प्रामाणिकपणे दिवा शहरातील लोकांच्या हितासाठी आहे. त्यामुळे दिवावाशियांचे हित जिथे आहे त्यासाठी मी ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिंदे गटाच्या विरोधात लढण्यासाठी खंबीर पाठिंबा आणि भूमिका घेणारा पक्ष दिव्यात गरजेचा आहे.उद्धव ठाकरे यांच्या माध्यमातूनच हे होऊ शकते यासाठी मी शिवसेनेचा भगवा झेंडा हातात घेतला आहे असे सणसणीत उत्तर रोहिदास मुंडे यांनी दिले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२३ ऑक्टोबर २०२३


## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शहीद पोलिसांना अभिवादन

**मुंबई :** देशभरात कर्तव्य बजावताना धारातीर्थी पडलेल्या पोलीस दलातील शहीद अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. नायगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या हुतात्मा मैदानावर आयोजित कार्यक्रमाला आमदार कालिदास कोळंबकर, पोलीस महासंचालक रजनीश शेठ, पो.आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी, शहिदांचे नातेवाईक उपस्थित होते.

# कळवा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विलास शिंदे यांच्यामुळे मिळाला
# दिव्यातील नागरिकांना न्याय, नागरिकांनी केला शिंदे यांचा सत्कार

**दिवा :-** दिवा शहरातील गणेश नगर येथील गणेश मंदिर को ऑप हौसिंग सोसायटी मधील रहिवासी यांच्यावर स्थानिक विकासकाकडून चाळीच्या जागेवर बिल्डिंग उभी करण्यासंदर्भात वारंवार दबाव टाकला जात होता. सदरच्या संदर्भात सोसायटीमधील रहिवाशी यांनी ठाणे पोलीस आयुक्त, उप आयुक्त ,सहाय्यक पोलीस आयुक्त – कळवा विभाग, मुंब्रा पोलीस ठाणे याठिकाणी निवेदन अर्ज दाखल केले होते. सदरच्या अर्जाची तात्काळ दखल घेत ,सहाय्यक पोलीस आयुक्त कळवा विभाग विलास शिंदे यांनी आपल्या कर्तव्य तत्परतेने गणेश मंदिर को ऑप हौसिंग सोसायटी मधील रहिवाशांना न्याय मिळवून दिला.



याकामी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गणेश जाधव यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले. त्याबद्दल गणेश मंदिर को ऑप हौसिंग सोसायटी मधील रहिवाशी यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय – कळवा विभाग येथे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विलास शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. तसेच त्यांचा सोसायटीमधील रहिवाशांच्या वतीने कृतज्ञता पूर्वक गौरव सत्कार करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गणेश जाधव यांच्या हि कार्याचा गौरव सत्कार करण्यात आला. यावेळी गणेश मंदिर को ऑप हौसिंग सोसायटीचे सचिव श्री . अभिषेक अशोक जाधव यांनी प्रास्ताविक करताना गोर गरिबांचे कैवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असणारे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी असे गौरव उद्गार सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विलास शिंदे यांच्या संदर्भात केले. शाल, पुष्पगुच्छ आणि प्र.के. अत्रे लिखित दलितांचे बाबा हे पुस्तक भेट स्वरूपात देऊन गौरव सत्कार सोसायटीचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बुर्टे , उपाध्यक्ष सौ.दीपिका दशरथ टेमकर, सचिव अभिषेक अशोक जाधव, उपसचिव प्रिया विश्वकर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गणेश जाधव यांचा गौरव सत्कार सल्लागार प्रमुख सौ. वैशाली बाईत, सह खजिनदार सौ. सोनाली योगेश पाष्टे, प्रमुख संघटक सौ. पूजा बुर्टे, सौ. रंजना राजू पाटील , सौ. कलावती रणझुंझारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सह अध्यक्ष श्री. नितीन सावंत,श्री. राजेंद्र बाईत , सुशांत अडसुळे, विनोद काईता , अशोक जाधव, विकी लोंढे, सुभाष बडबे, कार्यकारणी सदस्य सौ. कविता पाटील , कार्यकारी सल्लागार सौ. जनाबाई दळवी ,नमिता चौधरी , वनिता दवंडे, निशा भोसले, भावना रावणेकर , नम्रता कदम , वैष्णवी कूड, दिक्षा पवार, मीना गणेश जाधव, सुकन्या जंजिरकर,रुपाली साळूंके आदी सोसायटीमधील स्त्री पुरुष रहिवाशी उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त श्री. विलास शिंदे यांना इतक्या सामान्य गोर गरीब जनतेचे प्रेम पाहून अक्षरशः गहिवरून आले , माझ्या ३५ वर्षाच्या कारकिर्दीत मी पुष्कळ सामाजिक काम पोलीस सेवेत केले परंतु कामाची पोच द्यायला कोणीच येत नाही , असे प्रसंग फार दुर्मिळ घडतात. माझे पुष्कळ सत्कार झाले आहेत. पण या सत्काराचे महत्व माझ्या आयुष्यात खूप उच्च स्थानी राहील असे म्हणून उपस्थित सर्व सोसायटीमधील रहिवाशांचे त्यांनी आभार मानले. माझे सदैव सहकार्य आणि पाठबळ असेच अविरतपणे सोसायटीमधील सर्व रहिवाशी सदस्यांना राहील असे आश्वासन त्यांनी उपस्थित सर्वांना दिले.

## निलेश पाटील यांच्या वतीने यशोदा नगर येथे दिव्यातील सर्वात मोठ्या दांडिया उत्सवाचे आयोजन

**दिवा :-** साबे गावातील यशोदा नगर येथे राजे प्रतिष्ठानच्या माध्यमातून निलेश पाटील व अर्चना पाटील यांनी दिव्यातील सर्वात मोठ्या दांडिया उत्सवाचे आयोजन केले.या दांडिया उत्सवाला प्रभागातील नागरिकांनी उस्फूर्त असा प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात गर्दी केली. अतिशय नियोजन पद्धतीने आयोजित केलेल्या या दांडिया उत्सवाचे कौतुक दांडिया प्रेमी नागरिकांनी करत निलेश पाटील आणि अर्चना पाटील यांना धन्यवाद दिले.









दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२३ ऑक्टोबर २०२३ पान : ५
www.diwanews.com

## ठाण्यात गॅस गळती सुरूच, साडेचार महिन्यात तब्बल १७ गंभीर घटना

**ठाणे:** घरगुती गॅस सिलिंडर असो या गॅस पाईपलाईन तसेच रिक्षातील सीएनजी असो किंवा रुग्णालयातील ऑक्सिजन असो, या गॅस गळतीच्या घटनांची ठाण्यात जणू मालिकाच सुरू आहेत. ०१ जूनपासून १५ऑक्टोबर पर्यंत तब्बल १७ घटना नोंदवल्या गेल्या आहेत. पण, सात घरगुती गॅस गळती होऊन लागलेल्या आगीत दोघांना दुर्देवी मृत्यू झाला आहे. तर फायरमन सह चौघे जण जखमी झाले आहेत. याशिवाय घरगुती वस्तूसह कपडे इ. साहित्य जळूनही नुकसान झाले .

# बेरोजगार तरुणांचे भविष्य अंधारात ठेवणाऱ्या काँग्रेस, उबाठा, महाविकास आघाडीचा निषेध

**ठाणे :** राज्य सरकारच्या प्रशासनात कंत्राटी पद्धतीची सुरूवात करून बेरोजगार तरुणांचे भविष्य अंधारात ठेवणाऱ्या काँग्रेस, उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीचा भाजपातर्फे आज तीव्र निषेध करण्यात आला. भाजपा ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले व आमदार निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर झालेल्या आंदोलनात महाविकास आघाडीच्या निषेधाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या.

राज्यात कंत्राटी पद्धतीची सुरूवात महाविकास आघाडी सरकारच्या काळात करण्यात आली होती. २००३ पासून काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, तर महाविकास आघाडीचे उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात वेळोवेळी कंत्राटी पद्धतीने वाहनचालकांपासून लेखापाल पदापर्यंत नियुक्त्या करण्यात आल्या. स्वयंपाकी, शिपाई, वसतीगृह रक्षक अशा चतुर्थश्रेणी पदांवरही कंत्राटी नियुक्त्या करून हजारो बेरोजगारांवर नोकरीची टांगती तलवार ठेवण्यात आली, याकडे भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी लक्ष वेधले. तसेच सध्या बेरोजगार तरुणांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीकडून केला जात असल्याचा आरोप केला.




राज्यात कंत्राटी भरतीचे प्रणेते असलेल्या महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांना कंत्राटी भरतीविरोधातच आंदोलने करताना लाज कशी वाटत नाही, असा सवाल जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केला. तरुणांची माथी भडकवून महाराष्ट्रात अशांतता निर्माण करण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न हा निषेधार्ह आहे. कंत्राटी भरतीचे १००% पाप उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचे आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागावी, अशी मागणीही वाघुले यांनी केली. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष वाघुले, आमदार निरंजन डावखरे यांच्याबरोबरच प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, सरचिटणीस मनोहर सुगदरे, सचिन पाटील, विलास साठे, डॉ. समीरा भारती, माजी नगरसेवक मुकेश मोकाशी, उपाध्यक्ष जयेंद्र कोळी, सागर भदे, डॉ. राजेश मढवी, कैलास म्हात्रे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा स्नेहा पाटील, शीतल कारंडे, नताशा सोनकर, वृषाली वाघुले-भोसले आदी पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. महाविकास आघाडी आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारने कंत्राटी पद्धतीने भरतीची पद्धत सुरू करून महाराष्ट्रातील लाखो बेरोजगार तरुणांच्या आयुष्यात अंधार पसरविला होता. महायुती सरकारने कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द करून बेरोजगारांच्या आयुष्यातील अंधार दूर केला, अशा शब्दांत भाजपाचे जिल्हाध्यक्ष व माजी नगरसेवक संजय वाघुले यांनी महायुती सरकारच्या निर्णयावर आनंद व्यक्त केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कंत्राटी भरती रद्द करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल महायुती सरकारचे आभार मानण्यात आले.

# बाळकुम येथे पार पडले
## आयुष्यमान भव: अभियान

**ठाणे :** शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या आयुष्यमान भव: अभियानातंर्गत सोमवारी बाळकूम आरोग्य केंद्रामार्फत साप्ताहिक आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. बाळकूम परिसरात डेंग्यू, मलेरिया या आजारांचे रुग्ण वाढत असून याबाबत दोस्ती बांधकाम परिसरात जनजागृती करण्यात आली. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी काम करणारे कामगार यांना डेंग्यू, मलेरिया या आजारांची माहिती देण्यात आली.

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त उमेश बिरारी, वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतना नितिल, उपवैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिताली हुमरस्कर यांच्या सहकार्याने हा मेळावा पार पडला. यावेळी बाळकूम परिसरात औषध व धूरफवारणी करण्यात आली. तसेच दोस्ती बांधकाम येथे काम करणाऱ्या कामगारांची वैद्यकी आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत आरोग्यतपासणी करण्यात आली व आजाराचे निदान करुन २०० जणांना औषधोपचार देण्यात आले. तसेच डेंग्यू, मलेरियाचे निवारण करण्यासंदर्भातील माहितीपत्रके देण्यात आली. तर १८३ जणांचे मलेरिया, डेंग्यू याबाबतच्या चाचण्या करण्यात आल्या. १८४ जणांची रक्तदाब तर १८३ जणांची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली. ३४ जणांचे क्षयरोग एक्स रे काढण्यात आले तर ५ जणांना धनुर्वाताची लस देण्यात आली. १० ठिकाणचे पाणी नमुने देखील यावेळी घेण्यात आले. तर मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, किडनी आजार इ. तपासणी, निदान, उपचार, संदर्भसेवांचे आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड नोंदणी देखील या मेळाव्यादरम्यान करण्यात आली.

बाळकूम आरोग्य केंद्रातंर्गत घेण्यात आलेल्या या मेळाव्यास वैद्यकीय अधिकारी डॉ. माधवी देवल यांच्यासह जीवनशास्त्रज्ञ, फायलेरिया व मलेरिया आदी विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# जिल्हा स्तरीय रायफल शूटिंग स्पर्धा
## मेजर सुभाष गावंड शूटींग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची उत्तम कामगिरी

**ठाणे :** ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे नुकतेच जिल्हा स्तरीय रायफल शूटिंग स्पर्धा पार पडली या स्पर्धेत ठाणे पूर्व कोपरी येथील मेजर सुभाष गावंड शूटींग अकॅडमी (द्रोणाचार्य स्पोर्ट्स अकॅडमी) चा नेमबाजांनी उत्तम कामगिरी केली.

ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे क्रीडा व युवा सेवा संचालनालय,जिल्हा परिषद,ठाणे व ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय रायफल शूटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये १०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग होता. त्यापैकी प्रशिक्षक अक्षय पांडुरंग साळुंखे आणि अजित पाटील ह्यांचा




मार्गदर्शनाखाली यामध्ये १७ वर्षाखालील गटात श्रीमई नायक - सुवर्ण,सिध्देश थोरात - सुवर्ण,देवांश पाटील - सुवर्ण ,अर्णव राणे - सुवर्ण, मिहिर संबोधी - सिल्व्हर,देवरश पाटील - सुवर्ण,अर्णव शिरसाट - सिल्व्हर आदी नेमबाजांनी पदक पटकाविले.

ठाण्यातील कोपरी ठाणे पूर्व येथील मेजर सुभाष गावंड शूटींग अकॅडमी (द्रोणाचार्य स्पोर्ट्स अकॅडमी) मध्ये मुलांना देण्यात असलेल्या उत्कृष्ट प्रशिक्षणामुळंच अकॅडमी मधील ५ मुलांनी सुवर्ण तर दोन मुलांनी सिल्व्हर पदक पटकावले. सर्वात जास्त पदके मिळवणारा ठाण्यातील हि एकमेव शूटिंग क्लब ठरले आहे.

## आईस्क्रीम बनविणाऱ्या दुकानाला आग

**ठाणे:** कळवा-खारेगाव येथील पवार गल्लीत असलेल्या हर्षला अपार्टमेंट या इमारतीच्या तळमजल्यावरती असलेल्या मे. विंगो ओझस या आईस्क्रीम बनविणाऱ्या दुकानामध्ये आग लागल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास समोर आली. त्या दुकानातील विद्युत केबल, कागदी पुठ्ठे, फ्रिज यांना किरकोळ प्रमाणात आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, त्या आगीवर २० मिनिटात नियंत्रण मिळवले. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नाही.

# लोकसभा निवडणुकीत महायुतीला ५१ टक्के मतांची जबाबदारी भाजपाचीच!

## भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही

**ठाणे:** लोकसभा निवडणुकीसाठी महाविजय-२०२४ मोहिमेअंतर्गत महाराष्ट्रात महायुतीला ४५ हून अधिक जागांवर ५१ टक्के मतांसह विजय मिळवून देण्याची जबाबदारी भाजपाची असेल, अशी ग्वाही भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करून स्वप्नातील भारत घडविण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते महायुतीमध्ये एकदिलाने कार्य करतील, असे बावनकुळे यांनी नमूद केले.

भाजपाच्या महाविजय-२०२४ मध्ये ठाणे लोकसभा प्रवास योजनेंतर्गत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून ठाणे शहराचा आज झंझावाती दौरा करण्यात आला. या दौऱ्यात त्यांनी गडकरी रंगायतनमध्ये भाजपाच्या एक हजार 'सुपर वॉरियर्स'बरोबर संवाद साधला. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी लोकसभा निवडणूकप्रमुख विनय सहस्रबुद्धे, आमदार गणेश नाईक, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार गीता जैन, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, लोकसभा प्रवास योजनेचे संयोजक संजय भेगडे, समन्वयक जयप्रकाश ठाकूर, भाजपाच्या सरचिटणीस माधवी नाईक, विक्रांत पाटील, माजी खासदार संजीव नाईक, विभागीय संघटन मंत्री हेमंत म्हात्रे, विधानसभा मतदारसंघांचे निवडणूक प्रमुख सुभाष काळे, मनोहर डुंबरे, रवी व्यास, ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, मिरा-भाईंदर जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा, संदिप लेले, दीपक जाधव आदी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, केंद्र सरकारच्या नऊ वर्षातील कल्याणकारी योजनांमुळे जनतेच्या मनात मोदी सरकार आहे. केंद्र सरकारचे कार्य जनतेपर्यंत पोचविण्यासाठी घर चलो अभियान सुरू करण्यात येईल. त्यात ठाणे शहरातील चार विधानसभा मतदारसंघात ६०० हून अधिक सुपर वरियर्स साडेतीन लाख घरांमध्ये संपर्क साधतील, असे बावनकुळे यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला ५१ टक्के मते मिळवून देण्याची जबाबदारी भाजपाची आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. ठाणे लोकसभा मतदारसंघ हा युतीतील कोणीही मागितलेला नाही किंवा कोणालाही दिलेला नाही. लोकसभा निवडणुकीतील जागा वाटपाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह भाजपाचे पार्लमेंटरी बोर्ड निर्णय घेईल. लोकसभा मतदारसंघाची जागा कोणत्याही पक्षाला गेली, तरी त्यांच्या विजयाची जबाबदारी भाजपाचीच असेल. लोकसभेच्या ४८ व विधानसभेच्या २८८ जागांवर भाजपा संघटनात्मक तयारी करीत आहे. भाजपाची ५१ टक्के मतांची ताकद महायुतीच्या उमेदवारांमागे भक्कम उभी केली जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत महायुतीचे सरकार सकारात्मक आहे. उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात मराठा आरक्षण गमावले होते. मात्र, आता महायुतीचे सरकार ओबीसी आरक्षणाला धक्काही न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळवून देईल, असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# राज्य सरकारच्या निधीतून सुरु असलेल्या कामांना १५ डिसेंबरची डेडलाईन



**ठाणे :** ठाणे शहर खड्डेमुक्त करण्यासाठी राज्य सरकारने दिलेल्या ६०५ कोटी रुपयांच्या निधीतून सुरू असलेली रस्त्यांची सर्व कामे कोणत्याही परिस्थितीत १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण झालीच पाहिजेत. रस्त्यांची जी कामे प्रलंबित राहतील त्याबद्दल जबाबदारी निश्चित केली जाईल, असे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात ६०५ कोटी रुपयांच्या निधीतून एकूण २८२ रस्त्यांची कामे सुरू झाली आहेत. त्यात, विविध ठिकाणी यूटीडब्ल्यूटी, सिमेंट कॉंक्रिटीकरण, मास्टिक पध्दतीने रस्त्यांची कामे केली जात आहेत. नागरिकांना चांगल्या प्रकारचे व खड्डेमुक्त रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी सुरू असलेली ही कामे ८० ते ९० टक्के पूर्ण झाली आहेत. पावसाळ्याच्या मोसमात, जुलै महिन्यापासून ही कामे थांबविण्यात आली होती. आता ती कामे पुन्हा सुरू झालेली आहेत. त्यापैकी, जी कामे अपूर्ण आहेत ती महिन्याभरात आणि जी कामे नव्याने सुरु करायची आहेत ती दोन महिन्यात पूर्ण करण्याचे बंधन सर्व कार्यकारी अभियंता यांच्यावर टाकण्यात आले आहे.

सर्व अपूर्ण व नवीन कामाची यादी करून त्यांची कालमर्यादा आखून घ्यावी. त्यात, प्रलंबित कामांसाठी, भूसंपादन करण्याचा विषय वगळता कोणताही अपवाद केला जाणार नाही. काही कामे शक्य नसतील तर त्याची सयुक्तिक कारणमीमांसा सादर करावी. तशा कामांबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेतला जाईल, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निधी मंजूर करताना गुणवत्तापूर्ण काम आणि कालमर्यादा याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे या प्रकल्पातील काम सुरू आहेत असे होता कामा नये. कमीत कमी कालावधीत हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अभियंत्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आयुक्त बांगर म्हणाले.

# ठाणेकरांना टोलमाफी मिळायलाच हवी : महाविकास आघाडीची मागणी



**ठाणे :** शहरात होत असलेली वाहतुक कोंडी, वाढते नागरीकरण, वाढणारी वाहनांची संख्या त्याचप्रमाणे महापालिका हद्दीत टोलनाक्यावर होणारी गर्दी, अवजड वाहने, यामुळे शहरातील रस्त्यांवर ताण वाढत आहे. परंतु त्यावर पर्याय दिले जात नाहीत. त्यामुळे ही वाहतुक कोंडी सोडविण्यास यावी अन्यथा वाहतुक शाखा कार्यालयाबाहेर आंदोलन केले जाईल असा इशारा महाविकास आघाडीने मंगळवारी ठाण्यात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिला. तसेच ठाणे, मुलुंड, ऐरोली येथील टोलनाक्यावर एमएच ०४ आणि ०५ या वाहनांसाठी टोल मुक्त करावेत अशी मागणी कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी केली.

ठाणे महापालिका हद्दीत नको तिथे डिव्हाडर टाकले जात आहेत, शहरातील रस्त्यांवर फेरीवाले बसविले जात आहेत. अवजड वाहनांची संख्या वाढत आहे, दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे बांधकाम व्यवसायिकांची रेती,खडी आरएमसी, इ साहित्य घेऊन जाणारी अवजड वाहने ,ट्रक, खाजगी बस, यामुळे प्रचंड वाहतुक कोंडी होत आहे. महापालिका,वाहतुक पोलीस, एमएमआरडीए यांच्या चुकीच्या धोरणामुळे करदात्यांचा पैसा डिव्हाडरवर खर्च होत असल्याचा आरोपही चव्हाण यांनी केला. पर्यायी रस्ते निर्माण करणे, सबवे, रस्ते रुंद करणे सत्ताधाऱ्याना अपयश आले आहे. मतांसाठी शहरातील विविध ठिकाणी फेरीवाल्यांना बसविले जात आहेत, त्याचा सामान्य जनतेला त्रास होत आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदुषण होत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचेही ते म्हणाले.

टोलनाक्यावर बेकायदेशीर रित्या टोल गोळा केला जात आहे,टोलमाफीसाठी मनसे आंदोलन घेतले होते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील टोल विरोधात आंदोलन केले होते. परंतु अद्यापही टोल रद्द झालेला नाही. मनसेला आमचा पाठींबा नाही,मात्र मनसे नेते अविनाश जाधव यानी याबाबत घेतलेल्या भुमिकेला आमचा जाहीर पाठींबा असल्याचेही ते यावेळी म्हणाले. यावेळी वाहतुकीबाबत बोलताना सुमीत बाबा कोण? असा सवाल करित ठाण्यात कुठेही कसेही रस्त्यात डिव्हाडर टाकले जात आहेत, त्यांच्यामार्फत करण्यात आलेल्या बदलांचा फटका ठाणेकरांना सहन करावा करावा लागत आहे. त्याने केलेल्या बदलामुळे ठाणे शहरात कधी नव्हे इतकी वाहतुक कोंडी होत आहे. त्यामुळे आता महापालिका आयुक्तांच्या खुर्चीवर त्याच बाबाला बसवा अशी मागणी राष्टवादी शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष सुहास देसाई यांनी केली.

यावेळी , राष्ट्रवादी कॉंग्रेस शहराध्यक्ष सुहास देसाई,शिवसेना (उ.बा.ठा)प्रवक्ते चंद्रभान आझाद,कॉंग्रेस मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे,राहुल पिंगळे,बाळासाहेब भुजबळ,राष्ट्रवादी युवक अध्यक्ष विक्रम खामकर,कॉंग्रेस नेत रमेश इदिसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि.२३ ऑक्टोबर २०२३ 
www.diwanews.com

## पेसा क्षेत्रातील उमेदवारांना शिक्षक भरतीच्या टीईटी परीक्षेसाठी प्रशिक्षण

**मुंबई :** अनुसूचित क्षेत्रातील १७ अधिसूचीत संवर्गाच्या पदभरतीसाठी रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये शिक्षक संवर्गाचा देखील समावेश आहे. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्वानुसार शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य आहे. त्यामुळे 'पेसा' क्षेत्रातील उमेदवारांना शिक्षक भरतीच्या टीईटी परीक्षेसाठी आदिवासी विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# दिव्यातील विविध मंडळातर्फे आयोजित नवरात्री उत्सवात विराजमान दुर्गामाता!


नवदुर्गा मित्र मंडळ (मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा-पूर्व)



हरिश्चंद्र अपार्टमेंट बिल्डिंग नं. ए-बी-सी-डी
(मुंबादेवी कॉलनी रोड, दिवा)



उत्तर भारतीय मंडळ (मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा)


ॐ साई सृष्टी नवरात्रोत्सव मंडळ
(दिवा-आगासन रोड, दिवा)


दिवा विकास प्रतिष्ठान पुरस्कृत
सेवासंघ मित्र मंडळ (मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा)


साबे गावात राजे प्रतिष्ठान आयोजित मंडळाच्या
नवरात्री उत्सवातील विराजमान दुर्गा माता!


ॐ श्री साईलीला मित्र मंडळ
(गुरुदर्शन नगर, मुंब्रा देवी कॉलनी रोड, दिवा-पूर्व)


विश्वास सामाजिक संस्था ठाणे आयोजित
नवरात्रोत्सव २०२३ (ठाणे)


सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ
(दळवी नगर, दातिवली दिवा-आगासन, दिवा)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२३ ऑक्टोबर २०२३ | पान : ८
www.diwanews.com

## आरटीओ मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्या ऑनलाईन करण्याचा निर्णय

**मुंबई :** : परिवहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक आणि सहायक मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्या यावर्षापासून ऑनलाईन करण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. आज सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कळ दाबून बदलीपात्र अधिकाऱ्यांची संगणकीय यादी करण्यात आली. या यंत्रणेच्या माध्यमातून पूर्णत: पारदर्शकपणे आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय बदल्यांची कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

# पाण्यासाठी ३० ते ४० लाखाची खंडणी दर महिन्याला गोळा होतेय

**ठाणे :** स्थानिक लोकप्रतिनिधीचे १६ गुंड कळवा पूर्व येथील लोकांकडून दर महिन्याला ३० ते ४० लाखाची खंडणी गोळा करतात, अशी माहिती पोलिसांनी दिल्याची माहिती बुधवारी ठाण्यात एका पत्रकार परिषदेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस नजीब मुल्ला यांनी दिली.



कळवा पूर्व येथे विघ्नहर्ता गणेशाच्या दर्शनाला गेल्यावर लोकांनी पिण्याच्या पाण्याविषयी आमच्याकडे तक्रारी केल्या. स्थानिक लोकप्रतिनिधींची लोक प्रत्येक कुटूंबाकडून बोअरवेलच्या पाण्यासाठी ५०० रुपये गोळा करत असतात अशी माहिती दिली. याबाबत पोलिसांकडे शहनिशा केल्यानंतर पोलीसांच्या तपासात येथील स्थानिक लोकप्रतिनिधींचे १६ गुंड दर महिन्याला लोकांकडून ३० ते ४० लाख रुपयांची खंडणी गोळा करत असल्याची माहिती दिली, ही खंडणी वसूल करणार्यांची नावे व यामागील सूत्रधार लवकरच जाहीर करणार असल्याचेही नजीब मुल्ला यांनी संकेत दिले.

कळवा पूर्व येथील भास्कर नगर, पौंडपाडा, आतकोनेश्वर नगर येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या तक्रारीनंतर ठाणे महापालिका आयुक्तांकडे तत्काळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने निवेदन दिले असून स्थानिक खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मदतीने केंद्र सरकारच्या अमृत योजनेंतर्गत २४० कोटी रुपये पिण्याच्या पाण्यासाठी महापालिकेला देण्यात आले आहेत. या अमृत योजनेतुन कळवा पूर्व येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सहा महिन्यात मार्गी लावणार आहेत, ही बाब आमदार जितेंद्र आव्हाड यांना कळल्यानंतर गेली १४ वर्ष शांत बसलेले आव्हाड जागे झाले आणि शुक्रवारी कळवा पूर्व येथील नागरिकांच्या पाण्यासाठी हंडा मोर्चा काढून श्रेयाचे राजकारण करत असल्याचा आरोप मुल्ला यांनी केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे, ज्येष्ठ नगरसेवक प्रकाश बर्डे, युवक काँग्रेस अध्यक्ष विरु वाघमारे, कार्याध्यक्ष संदेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाची ठाण्याची जम्बो कार्यकारणीची जाहीर

***ठाणे : राष्ट्रवादी शरद पवार गटाची ठाणे शहराची जम्बो नवीन कार्यकारणी जाहीर झाली असून यामध्ये २५ उपाध्यक्ष, १० सरचिटणीस, १० चिटणीस, ३२ सचिव, चारही विधानसभा अध्यक्ष, कार्याध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष, कार्याध्यक्ष, महिला कार्याध्यक्ष, आदींसह विविध सेलच्याही नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय माजी नगरसेवकांना विशेष निमंत्रीतांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. परंतु मुंब्रातील काही माजी नगरसेवकांनी वेगळी चुल मांडल्याने त्यांना यात स्थान देण्यात आले नाही. त्यात अनेक नव्या जुन्या चेहऱ्यांना संधी देत नाराजी देखील दूर करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.***

*राष्ट्रवादीचे दोन गट झाल्यानंतर शरद पवार आणि अजित पवार गट असे दोन गट तयार झाले आहेत. त्याचे पडसाद ठाण्यातही उमटल्याचे दिसून आले. त्यात ठाणे शहर अध्यक्ष असलेले आनंद परांजपे यांनी देखील अजित पवार यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांच्या जागी सुहास देसाई यांची शहर अध्यक्ष पदी नियुक्ती झाली होती. त्यानंतर शनिवारी शरद पवार गटाची ठाण्याची जम्बो अशी कार्यकारणी जाहीर झाली आहे. उपाध्यक्ष पदी थेट २५ जणांना संधी देण्यात आली आहे. इतकेच नाही तर ही संधी देतांना ज्यांना आतापर्यंत डावलण्यात आले होते, त्यांना देखील संधी देत आपलेसे करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्रभाकर सावंत, माजी नगरसेवक हिरा पाटील, एकनाथ जाधव यांच्यासह यात २५ जणांचा समावेश आहे.*

*दुसरीकडे सरचिटणीस (प्रशासन) पदी देखील १०, चिटणीस १० आणि तब्बल ३२ सचिव पदे देण्यात आली आहेत. तर तिजोरीच्या चाव्या अर्थात खजिनदार पदी माजी नगरसेवक अमित सरय्या यांची निवड झाली आहे. याशिवाय आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून चारही विधानसभेच्या ठिकाणी अध्यक्ष आणि कार्याध्यक्षांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ब्लॉक अध्यक्ष, कार्याध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. तर, युवक अध्यक्षपदी विक्रम खामकर, मयुर शिंदे याची युवक कार्याध्यक्ष, पल्लवी जगताप युवती अध्यक्ष आदींसह सामजिक न्याय, ओबीसी सेल, अल्पसंख्याक सेल, व्यापारी, असंघटीत कामगार, लीगल , वैद्यकीय, हॉकर्स, जेष्ठ नागरीक, सोशल मिडिया आदी पदावर देखील नव्याने नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.राष्ट्रवादीच्या जे शिल्लक आहेत, त्यातील बहुतुकांना विशेष निमंत्रीतांमध्ये संधी देण्यात आली आहे. यात मनोहर साळवी, मिलिंद पाटील, महेश साळवी, शाणु पठाण, माजी युवक अध्यक्ष मंदार केणी यांच्यासह ३८ जणांना विशेष निमंत्रीतांमध्ये स्थान देण्यात आले आहे.*

# ‘त्या’ तीन कंपन्याचा अध्यादेश रद्द करा

## ठाणे शहर काँग्रेसची मागणी

## स्थानिक भुमीपुत्रांना न्याय द्या

**ठाणे:** शासकीय, निमशासकीय संस्थेत होणारी भरती प्रक्रिया ही राज्य शासनाने काढलेल्या नव्या जीआरमुळे (अध्यादेश ) तीन खाजगी कंपन्यांच्या माध्यमातून केली जात आहे. परंतु असे झाल्यास स्थानिक भुमीपुत्रांवर अन्याय होणार असून ज्यांना ज्ञान नाही, अशी माणसे शासकीय सेवेत भरती होतील असा आरोप काँग्रसचे ठाणे शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी शुक्रवारी ठाण्यात पार पडलेल्या एका परिषदेत करत, ज्या तीन कंपन्याच्या बाबतीत हा अध्यादेश काढण्यात आला आहे, तो रद्द करावा आणि स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासकीय संस्थाच्या माध्यमातून त्या त्या ठिकाणची भरती प्रक्रिया राबविण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली.

पुढे बोलताना, शासनाने पहिला अध्यादेश हा २१ जानेवारी २०२१ रोजी काढला होता. त्यात चार कंपन्याना शासकीय निमशासकीय नोकर भरतीचे अधिकार दिले होते. परंतु हा अध्यादेश रद्द करुन पुन्हा नव्याने १८ जानेवारी २०२२ रोजी अध्यादेश काढून आधीच्या कंपन्या रद्द करुन नव्याने टी.सी.एस, आय. बी. पी. एस. व एम. के. सी. एल.



या तीन कंपन्याच्या माध्यमातून ही प्रक्रिया राबविण्यास सुरवात झाली आहे, परंतु शासकीय सेवेतील नोकरभरती खासगी संस्था कशी ठरविणार असा सवाल यावेळी चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. या कंपन्या ऑनलाईन पध्दतीने कागदपत्रे गोळा करणार, मुलाखती घेणार आणि तेच ठरविणार कोण पात्र आणि अपात्र, मात्र यातून स्थानिक भुमीपुत्रांना डावलले जाऊ शकते, आरक्षणाला त्यामुळे धक्का बसू शकतो अशी शंकाही त्यांनी उपस्थित केली, आधीच यातील आय.बी.पी.एस.या एका कंपनीवर भ्रष्टाचारा ठपका ठेवला गेला आहे, किंबहुना तो उघडकीसही आला आहे,असे असतांना त्यांच्याकडून केवळ लाखो रुपये घेऊन नोकर भरती केली जाईल अशी भितीही त्यांनी व्यक्त केली. त्यातही या कंपन्यांमध्ये केंद्रातील तसेच राज्यातील नेत्यांची भागीदारी असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. मुळात स्थानिक स्वराज्य संस्था हे नोकरभरती करण्यासाठी सक्षम असल्याने ते अधिकार त्यांच्याकडे देऊन या टी.सी.एस.,आय.बी.पी.एस. व एम.के.सी.एल.या तीनही कंपन्यांचे अध्यादेश रद्द करावेत अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या पत्रकार परिषदेला चव्हाण यांच्या सोबत शहर काँग्रेस उपाध्यक्ष भालचंद्र महाडिक, काँग्रेस मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे, राहुल पिंगळे, बाळासाहेब भुजबळ आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.